# मुले आणि मूल्ये

आपल्या आजच्या बालवयातील मुलांना, प्रौढ बनून पुढील शतकभराच्या काळात आपले आयुष्य व्यतित करायचे आहे. त्यांना नुसते जगायचे नाही तर चांगले जगायचे आहे. समाधानाने जगायचे आहे. त्यांना, अर्थातच, एकटयाने जगायचे नाही, तर इतरांबरोबर इतरांच्यात मिळून मिसळून जगायचे आहे. संघर्षात जगण्यापेक्षा शांततेत जगणे त्यांना आवडणार आहे. गुन्हेगारांच्या, अतिरेक्यांच्या, भ्रष्टाचारी राजकारणी नि सरकारी कर्मचारी यांच्या तसेच गरिबीत, गांजलेल्या लोकांच्या अन्याय्य जगात जगण्यापेक्षा सज्जनांच्या, विद्वानांच्या, कलावंतांच्या, खेळाडूंच्या आणि निरलस समाजसेवा करणाऱ्या कार्यकर्त्यांच्या, न्याय्य आणि सर्जनशील जगात जगणे त्यांना कितीतरी आनंदाचे नि अभिमानाचे वाटणार आहे. बालशिक्षणासाठी सज्ज झालेल्या कुतुहलप्रेरित बालकांना, उद्याच्या आनंदी आयुष्याचे स्वप्न, ते स्वप्न प्रत्यक्षात उतरवण्यासाठी क्षमता आणि त्याचबरोबर सारासार विचार वापरून वेळोवेळी निवड करण्याचे मूल्यसामर्थ्य नि विचारांचे स्वातंत्र्य मिळायला हवे, बालवयापासून मिळायला हवे. म्हणूनच मुलांना बालवयापासूनच प्राप्त होणारे बालशिक्षण हा त्यांचा नैसर्गिक हक्क म्हणून आपण सर्व बालप्रेमींनी स्वीकारला पाहिजे, तसेच बालशिक्षणाला नव्या जगाची नवी मूल्ये आत्मसात करता यावीत या दिशेने नवे वळण दिले पाहिजे.

माणसात मूल्ये रुजविणे म्हणजे, माणसाच्या मेंदूमध्ये विशिष्ट दृष्टिकोनाची नि त्यानुसार वागणुकीची प्रवृत्ती प्रतिमांकित होणे होय. या अर्थाने, मूल्यांचे स्थान मेंदूमध्ये असते, असे म्हणणे वावगे ठरणार नाही. मूल्यसंवर्धनाची गरज जरी सामाजिक असली तरीही ती अस्तित्वात असावी लागतात ती, अर्थातच, वैयक्तिक पातळीवरच.

मूल्ये निर्माण करता येतात आणि ती बदलताही येतात. मूल्ये ही मेंदूमध्ये दीर्घकाळ टिकणाऱ्या प्रतिमा असतात. इतर सर्वसाधारण नि दैनंदिन व्यवहारातील प्रतिमांपेक्षा त्या एका बाबतीत वेगळया असतात, आणि म्हणून महत्त्वाच्याही असतात. त्या आपल्याला इतर व्यक्तींशी, वस्तूंशी नि घटनांशी असणाऱ्या संबंधाविषयी विशिष्ट दृष्टिकोन बहाल करीत असतात. उदा. सर्वांप्रती समतेची दृष्टी असावी असे माननारे समता मूल्य हे मेंदूमध्ये काही बौद्धिक. तार्किक समर्थनावर आधारलेल्या प्रतिमारूपात साठवले जाते, आणि प्रत्यक्ष व्यवहारात वागण्याच्या वेळी आपल्या वागण्याला वळण द्यायला ते सिद्ध होते

**बालशिक्षणात भावनेचे महत्त्व**

आठ वर्षांपर्यंतचे मुलांचे वय हे, त्यांचा मेंदू तयार होण्याचे सर्वोत्तम व वेगवान वय असते. आजवरच्या शैक्षणिक प्रथेप्रमाणे, आपण मेंदूचा सर्व संबंध बौद्धिक विकासाशी, जोडत आलो आहोत. त्यांमुळे, केवळ मुलांच्या बौद्धिक विकासावर भर देणाऱ्या पालकांसाठी व समाजासाठी, मेंदूसाठीच्या गर्भसंस्कारांपासून ते मेंदूव्यायामांपर्यंत आणि घोकमपट्टीपासून ते बुद्धीविकासाच्या औषधांपर्यंत सर्व प्रकारच्या जाहिरातींचा मारा होत आला आहे. अलीकडेच मेंदूविषयीचे संशोधन आपल्याला या एकांगी मनोवृत्तीतून बाहेर काढू पाहत आहे, एवढेच नव्हे तर बालकांच्या बौद्धिक विकासासाठी नेमके काय करायला हवे याचे धडेही देत आहे.

माणसाला बौद्धिक मेंदूबरोबरच भावनिक मेंदूही असतो, आणि कित्येकदा तोच अधिक प्रभावी असतो हे सत्य आता नव्याने उलगडले आहे. किंबहुना, आपले शारीरिक आरोग्य, बौद्धिक मेंदूचे आरोग्य आणि भावनिक मेंदूचे आरोग्य या तीनही परस्पर संबंधित गोष्टी असून, भावनिक मेंदू हाच इतर दोन गोष्टींवर कुरघोडी करीत असतो, असे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे बालकाच्या शारीरिक व बौद्धिक विकासाला व त्यांच्या आयुष्यभरच्या कार्याला भावनांच्या कृतिशीलतेचे अधिष्ठान असते, हे नेमकेपणाने मनात ठसवूनच आपल्याला व्यवहारात बालशिक्षण घडवावे लागेल. त्यामुळे आजवरच्या बालशाळांमधील उपक्रमांमध्ये ज्याला अलीकडे ' भावनिक बुद्धिमत्ता ' असे म्हणतात त्या बुद्धिमत्तेच्या विकासाचे उपक्रम आवर्जून आणले पाहिजेत. एवढेच नव्हे तर, त्यांचा बौद्धिक व सामाजिक विकासाशी समन्वय साधता आला पाहिजे. बालशिक्षणातील संशोधनाचे हे एक नवे क्षेत्र आहे. हे व्यावहारिक स्वरुपाचे संशोधन आहे आणि आपल्याला शाळांमधून ते करीत जायचे आहे.

भावनिक बुद्धिमत्तेचा विकास दोन अंगांनी करावा लागेल आणि त्याकरिता बालशाळांच्या दैनंदिन कार्यक्रमामध्ये शोधकार्याला भरपूर वाव आहे, असा माझा कयास आहे.

एक - स्वतःच्या भाव-भावनांवर नियंत्रण ठेवून ( इतरांबरोबर ) वागता येणे आणि दोन - दुसऱ्यांच्या भाव-भावना समजावून घेऊन ( त्यांच्याशी ) वागता येणे.

मुलांच्या बाबतींत बालशिक्षणातून मूल्ये निर्माण होण्याचा, जोपासली जाण्याचा नि वाढण्याचा विचार आपण करणार असू तर, प्रत्यक्ष व्यवहारात आपल्याला, मुलांच्या भावनिक बुद्धिमत्तेला या दोन्ही अंगांनी सततचे खाद्य पुरवावे लागणार आहे. अर्थातच हे न केल्यास बालकांच्या शारीरिक व बौद्धिक आरोग्यावर विपरित परिणाम आणि ते सुद्धा कायमस्वरूपी होण्याचा धोका आपल्याला पत्करावा लागणार आहे. शिवाय, मेंदूची अंतर्गत बांधणी होत असण्याच्या वयात, म्हणजे बालवयात, लहान-मोठया भावनिक धक्क्यांचे होणारे परिणाम, हे प्रौढ वयात म्हणजे मेंदू बांधणी पूर्ण झाल्यानंतरच्या वयात होणाऱ्या परिणामांपेक्षा अधिक तीव्र नि दीर्घकाळ टिकणारे असे असतात. त्यामुळे लहान वय हे भावनिक सुरक्षितता देण्याचे महत्त्वाचे वय आहे हे सर्व पालकांनी नि शिक्षकांनी लक्षात घ्यायला हवे.

मुलांना लहानपणापासून इतरांच्या समवेत, अनेकांच्या सहवासांत राहायला नि वाढायला मिळायला हवे. असे झाले तर सर्वसाधारण सामाजिकतेचे भान मुलांना त्यांच्याही नकळत येऊ लागेल. शालेय व्यवहारात करावयाचा अभ्यास ही गोष्टच मुळी इतर समवयस्कांसमवेत करावयाची गोष्ट म्हणून मुलांच्या मनांत रुजली पाहिजे. अभ्यासाचे, नवनव्या गोष्टींचा शोध घेण्याचे आनंद हे इतरांच्या समवेत द्विगुणित होतात, याचा भरपूर अनुभव मुलांना शाळांमधून मिळाला पाहिजे. इतरांबरोबर एकत्र वावरता येणे हेच मुळी नागरिकत्वाचे प्रधान लक्षण असते आणि ते बालवयापासून प्रयत्नपूर्वक जोपासले जाऊ शकते. स्वतःच्या भावभावनांना वळण लावतानाच, दुसऱ्यांच्या भाव-भावनांचा सन्मान राखण्याची सवय या वातावरणांतून मुलांना प्राप्त होणार आहे, तसेच इतरांशी जुळवून घेताना, विद्यार्थ्यांना स्वतःच्या मनाची विवेकपूर्ण घडणही करता येणार आहे.

**बालशिक्षणात नागरिकत्वाचे महत्त्व**

नागरिकत्व हे मूलतः एखाद्या विशिष्ट गटाचे सर्वमान्य असे सभासदत्व असते. या सभासदत्वाचे स्वरुप राजकीय असते आणि त्याला असलेली मान्यता ही प्रामुख्याने कायद्याची मान्यता असते. उदाहरणार्थ, भारतात आपण ग्रामपंचायतीच्या अखत्यारीत आपल्या गावाचे नागरिक असू किंवा एखाद्या भाषिक राज्याचे नागरिक असू

अथवा आपण आपल्याला अगदी कायदेशीररित्या सार्वभौम भारताचे नागरिक म्हणून घेऊ शकतो. अनौपचारिकरित्या बोलायचे तर आपण आपल्याला या अखिल विश्वाचे नागरिक म्हणून संबोधू शकतो.

नागरिकत्वाच्या ( राजकीय) संकल्पनेत, आपण ज्या गटाचे सदस्य आहोत त्या गटाप्रती आपली काही कर्तव्ये मानलेली असतात आणि त्याचबरोबर आपल्याला काही हक्कही प्राप्त होत असतात. ही कर्तव्ये पार पाडणे आणि हक्क बजावणे यासाठी यासंदर्भातील काही किमान समज आणि साक्षरता आवश्यक असते. एवढेच नव्हे तर नागरिकत्वाच्या पालनाचे सवयीत रूपांतर होणे गरजेचे असते. लक्षात घेण्यासारखी गोष्ट अशी की, या सर्व गोष्टी माणसाच्या लहान वयांतील शिक्षणाशी जोडता येतात.

आपण सर्वजण भारतीय आहोत. भारतातील हवा, पाणी, अन्न यांनी आमचे शारीरिक पोषण होत आहे तर सभ्य संस्कृतीच्या संविधानाच्या आश्वासनाने आपण आपले राजकीय नि आर्थिक, सामाजिक नि सांस्कृतिक स्वातंत्र्य उपभोगत आहोत. आजूबाजूला, वेळोवेळी संघर्ष उभे राहतात ते हे आपले वातावरण टिकविण्यासाठी, समाजाची वाटचाल अधिक न्याय्यतेच्या दिशेने जाण्यासाठी. आजच्या विद्यार्थ्यांना न्याय्यता टिकविणारी व गरजेनुसार सामाजिक संघर्ष उभारण्याची ताकद देणारी अशी नागरिकत्वाची मूल्ये लहान वयातच प्राप्त करून देणे हे बालशिक्षणाचे, बालवयातील सामाजिक विकासाचे उद्दिष्ट मानता येईल.

भारतीय राज्यघटनेच्या जाहिरनाम्यातच उल्लेखिलेली स्वातंत्र्य, समता, बंधुता ही मूल्ये मानवी जीवनाकडे पाहण्याच्या एका विशाल दृष्टिकोनातून जन्माला आली आहेत. या दृष्टिकोणाला ' मानवतावादी दृष्टिकोण' असे म्हणता येईल. या दृष्टिकोणाचे मूलभूत वैशिष्ट्य असे की, हा, माणसा-माणसांमधील धार्मिक, जातीय, आर्थिक, राजकीय आणि भाषिक-सांस्कृतिक अशा कृत्रिम मानवी भेदांच्या पलीकडे जाऊन माणसांचा एकरूप असा विचार करणारा दृष्टिकोन आहे. माणूस असा विचार करू  शकतो, असे आपण मानतो, त्यामागे एक गृहीत आहे. माणसाला मेंदूसारखा प्रभावी अवयव प्राप्त झालेला आहे. त्याला बुद्धिनिष्ठतेने विचार करता येतो. उपजतच मनुष्य स्वातंत्र्याचा भोक्ता, समाजप्रेमी आणि सर्जनशील असतो. फक्त त्यांच्या विकसनासाठी मुलांना, लहान वयापासून संधी मिळाव्या लागतात. अशा संधी मिळवून देण्याच्या बाबतीत घरे आणि शाळा एकत्र आल्या पाहिजेत. मूल्यांचे संवर्धन यापैकी कुणा एका घटकाचे नाही. दोन्हीही घटकांनी परस्पर समन्वयाने करावयाचे असे हे काम आहे.

भारतीय राज्यघटनेने मूल्याधिष्ठित समाजाची एक चांगली दिशा आपल्याला देऊन ठेवली आहे. त्या दिशेने जाण्याचे वळण पुढील पिढीला मिळण्यासाठी घरात, शाळेत व प्रत्यक्ष परिसरातील समाजात वावरताना, मुलांनी ही मूल्ये आत्मसात करायला हवीत. अर्थातच, त्यासाठी विचारपूर्वक प्रयत्न करावे लागतील.

थोडक्यात असे की, बालशिक्षणाच्या विकासात्मक शिक्षणक्रमाला सामाजिक परिमाण देण्याचा प्रभावी मार्ग म्हणजे, त्यात मूल्यवर्धनाच्या उपक्रमांचा समावेश करणे होय. ग्राममंगल संस्थेने बालकाच्या मूल्यवर्धनाचा बारकाईने व विस्ताराने विचार करून सहा मूल्यांची एक मालिका तयार केली आहे. ही मूल्यमालिका मला अत्यंत ग्राहय वाटते. परिषदेने तिचा स्वीकार करून, बालशाळांसाठी तिचे उपक्रमांमध्ये रुपांतर करावे आणि तिचा आपल्या प्रचार-प्रसारामध्ये आग्रहहीधरावा, असे सुचवावेसे वाटते. ही मूल्यमालिका अशी आहे -

**स्वातंत्र्य आणि विवेक, समता आणि सहकार, श्रमानंद आणि सौंदर्य**

या सहा मूल्यांचे संवर्धन होणे हा बालशिक्षण व्यवहाराचा एक अविभाज्य भाग व्हावा, त्यासाठी अभ्यास, उपक्रमनिर्मिती आणि प्रसार यांचा खास प्रयत्न व्हावा, असे सुचवून मी आपली रजा घेतो.

( महाराष्ट्र बालशिक्षण परिषदेच्या इचलकरंजी येथे १३, १४ व १५ नोव्हेंबर २०१० या दिवशी आयोजित केलेल्या १७ व्या वार्षिक अधिवेशनातील भाषण)

❖